**नियमित दिवाणी दावा क्र. ४३/२०१५**

देवराव वि. शंकर

**नि.क्र. २६**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. व्ही. एम. क्षीरसागर यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

**६.** मी जन्मापासून मोवाड, ता. नरखेड, जि. नागपूर येथे राहतो. माझे इयत्ता नववी पर्यंत शिक्षण झाले आहे. मयत वादी क्र. १ – देवराव माझा सख्खा चुलत भाउ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणी मधील उल्लेखीत पॅराग्राफ ३ मधील मजकुर खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयत वादी क्र. १ – देवराव आणि प्रतिवादी क्र. १ शंकर या दोघांमध्ये सर्वे नं. ११३ दाव्यातील मालमत्यामध्ये वाटणी झाले आहे असे मी माझ्या सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित वाटणी माझ्या समक्ष झाली नाही. वाटणीचे निश्चीत तारीख मी सांगु शकत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की वाटणी सन २००२ मध्ये झाली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणीच्या शपथपत्र मध्ये नमुद पॅराग्राफ नं. ४(पहिल्यांदा लिहिलेला पॅराग्राफ नं. ४) मधील संपुर्ण मजकुर खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणीच्या शपथपत्र मध्ये नमुद पॅराग्राफ नं. ४(दुस–यांदा लिहिलेला पॅराग्राफ नं. ४) मधील संपुर्ण मजकुर खोटे आहे. प्रतिवादी क्र. १ माझ्या वडीलांचे सख्खे भाउ आहे. शिवराम राकेश यांना मयत वादी क्र.१ आणि प्रतिवादी क्र. १ असे दोन मुलं आहेत. शिवराम राकेश यांना आशा, बेबी आणि प्रतिभा नावाचे ३ मुली आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयात निशाणी २६ वर खोटी शपथपत्र दाखल करुन वादी माझ्या जवळचा नातेवाईक असल्यामुळे त्याला मदत व्हावी म्हणून मी आज रोजी शपथेवरती खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष,

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2026.01.06 17:43:55 -0500

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2026.01.06 17:44:05 -0500

**(रोहन विजयकुमार थाईल)**
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
नरखेड, जि. नागपूर.
दिनांकः ०६/०१/२०२६

**(रोहन विजयकुमार थाईल)**
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
नरखेड, जि. नागपूर.
दिनांकः ०६/०१/२०२६